International Year of Cooperatives
2025

**महाराष्ट्र शासन**

# महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

**दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७** **Email - patsanstharegulatoryboard@gmail.com**

जा.क्र.सआ-५/पत/ना.व ग्रा.पत/वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा/सुधारीत/११८६/२०२६ दिनांक :३० एप्रिल, २०२६

## परिपत्रक

**विषय :- नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा नव्याने निश्चित करणे – सुधारीत परिपत्रक**

संदर्भ :- नियामक मंडळाचे परिपत्रक दि.१५/०१/२०२० व दि.१९/०९/२०२५

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाच्या दि.१६/०४/२०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र.६ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर शेती पतसंस्थांसाठी वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| **निकष** | **वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा** | |
|---|---|---|
| | **परिशिष्ठ क्र.१** | |
| नवीन नोंदणीकृत संस्था व रु.१ कोटीपर्यंत ठेवी | सामान्य कर्ज | रू.१,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.५,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.१०,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.२** | |
| रु. १ ते १० कोटी पर्यंत ठेवी | सामान्य कर्ज | रू.२,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.४०,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.७५,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.३** | |
| रु.१० ते ५० कोटी ठेवी | सामान्य कर्ज | रू.२,५०,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.७५,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.१,२५,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.४** | |
| रु.५० ते १०० कोटी ठेवी | सामान्य कर्ज | रू.३,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.१,००,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / | रू.१,५०,००,०००/- |

| निकष | वैयक्तिक व समूह कर्ज मर्यादा | |
|---|---|---|
| | त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | |
| | **परिशिष्ठ क्र.५** | |
| रु.१०० ते ३०० कोटी ठेवी | सामान्य कर्ज | रू.४,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.१,२५,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.१,७५,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.६** | |
| रु.३०० ते ५०० कोटी ठेवी | सामान्य कर्ज | रू.५,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.१,५०,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.२,००,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.७** | |
| रु.५०० ते ८०० कोटी ठेवी | सामान्य कर्ज | रू.७,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.१,७५,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.२,५०,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.८** | |
| रु.८०० ते १००० कोटी ठेवी | सामान्य कर्ज | रू.८,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.२,००,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.३,००,००,०००/- |
| | **परिशिष्ठ क्र.९** | |
| रु.१००० कोटी पेक्षा जास्त ठेवी | सामान्य कर्ज | रू.१०,००,०००/- पर्यंत |
| | वैयक्तिक महत्तम कर्ज | रू.३,००,००,०००/- |
| | एका व्यक्तिचे कुटुंबिय / त्यांच्या कंपनी / फर्मस यांची एकत्रित महत्तम कर्ज | रू.५,००,००,०००/- |

खालील नमूद अटी व शर्तीचे पालन करणे सर्व बिगरकृषी पतसंस्थेस बंधनकारक राहील.

**<u>अटी व शर्ती :</u>**

१) वैयक्तिक व समुह कर्ज मर्यादा उपरोक्त नमूद परिशिष्टाप्रमाणे सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांना सदर निर्देश निर्गमित केलेचे दिनांकापासून आपोआप लागू होतील. यापुढे दि.१५/०१/२०२० व दि.१९/०९/२०२५ रोजीचे नियामक मंडळाचे निर्देशाद्वारे निश्चित केलेली कर्ज मर्यादा लागू असणार नाही.

२) उपरोक्त नमूद वैयक्तिक व समुह कर्ज मर्यादा लागू करणेसाठी कोणत्याही संस्थेस पोटनियम दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. तसेच उपरोक्त कर्ज मर्यादेमध्ये कोणत्याही स्तरावर (क्षेत्रीय स्तरावर) पोटनियम दुरुस्तीद्वारे बदल करता येणार नाही.

३) सहकार आयुक्तालयाचे दि.२७/०६/२०२५ रोजीचे कर्ज विषयक नियमामधील 'ड' मध्ये नमूद खालील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

i) ज्या संस्थेचे लगतचे मागील आर्थिक वर्ष अखेर ढोबळ एन. पी. ए. प्रमाण १५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक व २५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी असेल, अशा संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकाने संस्थेचे ढोबळ एन.पी.ए. प्रमाणित केल्यानंतर प्रचलित सर्व प्रकारच्या तारणी व विनातारणी कर्जाची कमाल मर्यादा १५% ने संचालक मंडळ मान्यतेने कमी करण्यात यावी.

ii) ज्या संस्थेचे लगतचे मागील आर्थिक वर्ष अखेर ढोबळ एन.पी.ए. प्रमाण २५ टक्के पेक्षा अधिक असेल, अशा संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकाने संस्थेचे ढोबळ एन.पी.ए. प्रमाण प्रमाणित केल्यानंतर प्रचलित सर्व प्रकारच्या केवळ तारणी कर्जाची कमाल मर्यादा २५% ने संचालक मंडळ मान्यतेने कमी करण्यात यावी. या शिवाय **अशा परिस्थितीत संस्थेला कोणतेही विनातारणी कर्ज नव्याने अदा करता येणार नाही अथवा नूतनीकरण करता येणार नाही.**

iii) वरीलप्रमाणे कमाल कर्ज मर्यादा कपात नियम हा सोने तारण, मुदत ठेव तारण, एन.एस.सी. तारण या कर्ज प्रकारास लागू राहणार नाही.

iv) वरीलप्रमाणे अनुक्रमे मर्यादा कमी केल्यानंतर संस्थेचे ढोबळ एन.पी.ए.प्रमाण कमी झाल्यानंतर संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी संस्थेचे ढोबळ एन.पी.ए. प्रमाण प्रमाणित केल्यानंतरच संचालक मंडळ मान्यतेने निर्धारित प्रमाणानुसार संस्थेला मूळ कर्ज मर्यादेप्रमाणे कर्जवाटप करता येईल.

४) सामान्य कर्जामध्ये पगार तारण कर्जाचा समावेश राहील. कोणत्याही दिवशी संस्थेचे एकूण सामान्य कर्ज (विनातारणी / जामिनकी कर्ज) हे कोणत्याही परिस्थितीमध्ये संस्थेच्या एकूण कर्जाच्या १५ ते २०% पेक्षा जास्त असणार नाही. (कर्जविषयक नियम परिपत्रक दि.२७/०६/२०२५)

५) समान तारणावर विविध व्यक्तींना / संस्थांना कर्ज दिले असल्यास सदरचे कर्ज हे वैयक्तिक महत्तम कर्जामध्ये धरले जाईल.

६) कर्जदार व सहकर्जदार यांची कर्ज मर्यादा स्वतंत्र न धरता ती वैयक्तिक महत्तम कर्ज मर्यादेमध्ये धरण्यात येईल.

७) संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षक यांनी त्यांचे लेखापरिक्षण अहवालामध्ये कर्ज मर्यादा व कर्जविषयक नियमाचे उल्लंघन याबाबत स्वतंत्र शेरे 'अ' भागामध्ये नमूद करावेत.

सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांनी सदरच्या सूचना आपले कार्यक्षेत्रातील सर्व नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था व सहकार विभागाच्या नामतालिकेवरील सर्व लेखापरीक्षकांच्या निर्दशनास आणुन देण्याची कार्यवाही करावी.

Tawar

**(दिपक तावरे** भा.प्र.से.**)**
**अध्यक्ष,**
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था
नियामक मंडळ तथा सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रति,**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण), (सर्व).
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).

४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (सर्व).
५. दि इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया, WIRC, बि.के.सी., बांद्रा, मुंबई-४०००५१.
६. दि इन्स्टीटयुट ऑफ कॉस्ट ॲन्डवर्क्स अकौंटंटस ऑफ ईंडिया, जन्मभूमीमार्ग, फोर्ट, मुंबई.
७. अध्यक्ष/सचिव, ऑडीटर्स कौन्सिल ॲन्ड वेलफेअर असो., पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
८. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य को-ऑप.ऑडीटर्स महासंघ, पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
९. प्रमाणित लेखापरीक्षकांच्या जिल्हास्तरीय संघटना (सर्व),
१०. अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी,............................ (सर्व पतसंस्था फेडरेशन)
(राज्य/ विभागीय / जिल्हा/ तालुका )
११. अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापक /सचिव ,.......................... नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. ..............तालुका ...............जिल्हा .......

**प्रत, माहितीस्तव** -

१) पर्यवेक्षकीय अधिकारी (सर्व), मुख्यालय, पुणे
२) कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान शाखा, मुख्यालय,पुणे
(कार्यालय संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव)
३) निवड नस्ती.

**प्रत - माहितीस्तव सविनय सादर,**
मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई-३२.